RNI NO. MAHMAR/25/A3029

दैनिक
# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ९९

दि.०८ ऑगस्ट २०२६, वार : शनिवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## प्रादेशिक परिवहन विभागात बॉडी वेअरेबल कॅमेऱ्यांची सुरुवात; कामकाज अधिक पारदर्शक आणि सुरक्षित

**लातूर / प्रतिनिधी :** नागरिकांची सुरक्षितता, कामकाजातील पारदर्शकता आणि अचूकता वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. परिवहन विभागातील क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आता बॉडी वेअरेबल कॅमेरे ( देण्यात आले असून, विविध तपासण्या व अंमलबजावणीदरम्यान त्यांचा वापर करण्यात येणार आहे.

या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून रस्त्यावरील वाहन तपासणी, दंडात्मक कारवाई, वायुवेग पथकाची मोहीम, तसेच वाहनचालक परवाना (लायसन्स) चाचणी आणि वाहन योग्यता प्रमाणपत्राच्या (फिटनेस) प्रक्रियेचे डिजिटल रेकॉर्डिंग केले जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक कारवाईची वस्तुनिष्ठ नोंद उपलब्ध राहणार असून कामकाज अधिक शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह होईल. या कॅमेऱ्यांमुळे अधिकारी व नागरिकांमधील संवाद अधिक सभ्य आणि पारदर्शक राहण्यास मदत होणार आहे. तसेच कोणत्याही वादग्रस्त प्रसंगी प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे डिजिटल पुरावे उपलब्ध राहणार असल्याने कायदेशीर प्रक्रिया अधिक सुलभ होईल. परिवहन विभागाच्या या उपक्रमामुळे अधिकारी आणि वाहनचालक या दोघांच्याही सुरक्षिततेला बळकटी मिळणार असून, कामकाजातील पारदर्शकता वाढण्यास मदत होईल. वाहनचालकांनी तपासणीदरम्यान सर्व वैध कागदपत्रे सोबत ठेवावीत, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे आणि रस्ता सुरक्षेसाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, लातूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.






## लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात भरती; १८ ऑगस्टला मुलाखत

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अंतर्गत सैनिक मुला-मुलींचे वसतिगृह व विश्रामगृहासाठी विविध अशासकीय पदांची भरती करण्यात येणार आहे. इच्छुक माजी सैनिक, माजी सैनिकांच्या पत्नी, विधवा तसेच इतर पात्र नागरिकांनी १८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अर्ज व मूळ कागदपत्रांसह प्रत्यक्ष मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

वसतिगृह अधीक्षक पदासाठी २ जागा (प्रत्येकी प्रतिमाह मानधन रु. ३१,८७५) तसेच सहायक वसतिगृह अधीक्षक पदासाठी २ जागा (प्रत्येकी प्रतिमाह मानधन रु. २४,८७५) उपलब्ध आहेत. स्वयंपाकी (महिला) पदासाठी ५ जागा (प्रत्येकी प्रतिमाह मानधन रु. १४,१०६), चौकीदार पदासाठी २ जागा (प्रत्येकी प्रतिमाह मानधन रु. २१,१५९), सफाई कामगार पदासाठी ३ जागा (प्रत्येकी प्रतिमाह मानधन रु. १३,२७१) आणि माळी पदासाठी २ जागा (प्रत्येकी प्रतिमाह मानधन रु. १३,२७१) भरण्यात येणार आहेत.

## तृतीय पंथीयांसाठी आरोग्य शिबीर व जनजागृती

**लातूर/प्रतिनिधी :** तृतीयपंथीयांच्या आरोग्य तपासणी व हक्कांविषयी जनजागृतीसाठी एकदिवसीय कार्यशाळा लातूर येथे पार पडली. सहायक आयुक्त समाज कल्याण, लातूर आणि सप्तरंग सेवाभावी संस्था, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ऑगस्ट रोजी सामाजिक न्याय भवन, आडत लाईन येथे कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे आयोजन सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले. अध्यक्षस्थानी उमेश सानवणे होते. अधीक्षक आर. व्ही. सुरकुटलावार, एस. डी. सराफ, एन. डी. शिंदे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

कार्यशाळेत जिल्ह्यातील तृतीयपंथीयांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यांच्या समस्या, हक्क व अधिकारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी कल्याण मंडळाच्या अध्यक्षा सानवी जेठवाणी यांनी कार्यक्रमात सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रादेशिक उपायुक्त उमेश सानवणे यांनी समाज कल्याण विभागाच्या योजनांची माहिती दिली. तृतीयपंथीयांनी शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. तसेच transgender.dosje.gov.in या पोर्टलवर नोंदणी न केलेल्यांनी आवश्यक कागदपत्रे सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयात जमा करावीत, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागेश जाधव यांनी केले. आभार प्रणिता सूर्यवंशी यांनी मानले.

## गुगल मॅप्समध्ये नवं अपडेट: आस्क मॅप्स बोलणार हिंदीत, भारतात रिअल-टाइम ट्रान्झिट

**मुंबई/प्रतिनिधी:** गुगलनं आपल्या मॅप्स ॲपमधील जेमिनी-आधारित नैसर्गिक भाषेतील प्रश्न विचारण्याच्या 'आस्क मॅप्स' या वैशिष्ट्यासाठी नवीन अपडेट्सची घोषणा केली. मूळत: मार्चमध्ये सादर करण्यात आलेल्या या फीचरमध्ये आता लक्षणीय सुधारणा करण्यात आल्या आहेत, ज्यात हिंदी भाषेचा सपोर्ट, रिअल-टाइम सार्वजनिक वाहतूक माहिती आणि वैयक्तिकृत शिफारसी यांचा समावेश आहे.

गुगलनं याला गेल्या दशकातील मॅप्समधील सर्वात मोठा बदल म्हटलं आहे, ज्यामुळं वापरकर्त्यांना अधिक सहजपणे आणि संदर्भानुसार माहिती मिळवणे शक्य होईल.

आस्क मॅप्स आता हिंदीमध्ये: आस्क मॅप्स आता हिंदीला सपोर्ट करतं, मागील संवाद लक्षात ठेवतं आणि वैयक्तिक माहितीच्या आधारावर शिफारसी देतं. गुगलच्या एका ब्लॉग पोस्टनुसार, वापरकर्ते आता इंग्रजीसोबतच हिंदीमध्येही प्रश्न विचारू शकतात, ठिकाणे शोधू शकतात आणि नैसर्गिक भाषेत शिफारसी मिळवू शकतात. यामुळं भारतातील मोठ्या वापरकर्ता वर्गासाठी मॅप्स वापरणे अधिक सोपं होणार आहे.

पर्सनल इंटेलिजन्स : या अपडेटमध्ये एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे 'पर्सनल इंटेलिजन्स'. फोटोज, ड्राईव्ह आणि इतर गूगल ॲप्सप्रमाणेच, मॅप्सला आता जीमेल खात्याशी जोडता येतं.

## शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी :** शेतकरी-शास्त्रज्ञ सुसंवाद (ता.०६) कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे आत्मा व कृषी महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात आले होते.

हवामान बदल, एल-निनो परिस्थिती आणि हवामानानुसार शेती व्यवस्थापन या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमती मनीषा बांगर होत्या. सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिगंबर पेरके व विस्तार विद्वेत्ता डॉ. वसंत सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सूर्यवंशी यांनी बदलत्या हवामानाचा शेतीवर होणारा परिणाम व उपाययोजना स्पष्ट केल्या.कीटकशास्त्रज्ञ डॉ. दयानंद मोरे यांनी एकात्मिक कीड व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. डॉ. विजय भामरे यांनी मित्र कीटकांचे महत्त्व व जैविक नियंत्रणाविषयी माहिती दिली. कृषी विज्ञान केंद्र, मांजरा येथील डॉ. पी. एच. उलेमाले यांनी फलोत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान व बागायती पिकांचे व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. प्रगतशील शेतकरी श्रीकृष्ण शिंदे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. त्यांनी हवामान-स्मार्ट व संशोधनाधारित शेतीचे अनुभव मांडले.

कार्यक्रमात शेतकरी, शास्त्रज्ञ व कृषी अधिकाऱ्यांमध्ये थेट संवाद झाला. शाश्वत शेती, पीक व्यवस्थापन, मृदा व पाणी व्यवस्थापन यावर सविस्तर चर्चा झाली. शेतकऱ्यांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचविणे हा कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी तिवडे यांनी केले. विजयकुमार गुडले आभार मानले.

## शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**लातूर/प्रतिनिधी :**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत जिल्ह्यातील शासकीय वसतिगृहांची २०२६-२७ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात मुलांची १४ व मुलींची १२ अशी एकूण २६ वसतिगृहे कार्यरत आहेत. लातूर शहरात मुलांचे ६ व मुलींचे ४ वसतिगृहे आहेत. औसा, निलंगा, उदगीर, देवणी, चाकूर येथे प्रत्येकी मुलांचे व मुलींचे एक वसतिगृह आहे. अहमदपूर येथे मुलांचे दोन व मुलींचे दोन, तर रेणापूर येथे मुलांचे एक व जळकोट येथे मुलींचे एक वसतिगृह कार्यरत आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांसाठी अर्जाची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२६ आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना जागा उपलब्ध नसल्यास भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ ऑनलाइन पद्धतीने देण्यात येणार आहे. वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज न केलेल्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे सर्व पात्र विद्यार्थ्यांनी वेळेत अर्ज करावेत, असे समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी कळविले आहे.

## जय हिंद साधन केंद्राची १५ वी वार्षिक सभा उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत स्थापन जय हिंद लोकसंचालित साधन केंद्राची १५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा महादेव पार्वती मंगल कार्यालय येथे उत्साहात झाली. सभेत महिला सक्षमीकरण, बचत गटांची प्रगती आणि विविध शासकीय योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी संस्थेच्या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले.

सभेस माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी सोमनाथ लामगुंडे, कोमल भारती, बालग्रामचे नंदा पितांबर, डॉ. प्रभावती वाडकर, भरत काळे, उद्धव तेलंग, नगरसेवक दत्ता सुरवसे, गजानन साळुंके आदी उपस्थित होते.

आरोग्य सहायक उद्धव तेलंग यांनी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मोफत उपचार व 'आभा' कार्डाबाबत माहिती दिली. नंदा पितांबर यांनी ग्रामीण बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण होत असल्याचे सांगितले. भरत काळे यांनी महिलांनी कर्जाचा योग्य वापर उद्योग-व्यवसायासाठी करावा, असे प्रतिपादन केले.

डॉ. प्रभावती वाडकर यांनी महिला धोरणामुळे झालेल्या सकारात्मक बदलांची माहिती दिली. दत्ता सुरवसे यांनी महिलांनी शासकीय योजनांचा लाभ घेऊन उद्योग सुरू केल्याचे नमूद केले. सोमनाथ लामगुंडे यांनी बचत गटांना १ ते २० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध होत असून परतफेडीचे प्रमाण ९९ टक्के असल्याचे सांगितले.

यावेळी उत्कृष्ट उद्योग करणाऱ्या महिलांसह सीआरपी, माविम मित्र मंडळ व कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

प्रास्ताविक सविता पाटील यांनी केले. सूत्रसंचालन मंगल वाघचौरे यांनी केले. आभार एन. आर. कांबळे यांनी मानले.

## मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गातील उपवर्ग म्हणून विचार करता येईल, राज्य सरकारचा हायकोर्टात दावा

**मुंबई/प्रतिनिधी:** अनुसूचित जाती-जमाती तसंच इतर मागासवर्गीय प्रवर्गातील आरक्षणाचं उपवर्गीकरण करण्यास कायदेशीर मान्यता असल्यानं, त्याच धर्तीवर इतर मागासवर्गीय प्रवर्गात मराठा समाजाचाही उपवर्ग म्हणून विचार केला जाऊ शकतो, असा युक्तिवाद शुक्रवारी राज्य सरकारच्या वतीनं मुंबई उच्च न्यायालयात करण्यात आला.

मराठा सामाजाचा ओबीसी उपवर्गात समावेश शक्य - राज्य सरकारच्या वतीनं महाधिवक्ता मिलिंद साठे यांचा सध्या हायकोर्टात युक्तिवाद सुरू आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील विविध निर्णयांचा दाखला देत आरक्षणाच्या उपवर्गीकरणाची संकल्पना त्यांनी हायकोर्टात स्पष्ट केली. अनुसूचित जाती-जमाती आणि इतर मागासवर्गीय प्रवर्गांमध्ये सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारे उपवर्ग तयार करण्यास हायकोर्टानं मान्यता दिलीय. त्याच अनुषंगानं मराठा समाजासाठी स्वतंत्र उपवर्ग निर्माण करण्याचा मार्गही उपलब्ध असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

राज्य सरकारनं आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी केंद्र सरकारनं लागू केलेल्या १० टक्के आरक्षणाचा दाखला देत ५० टक्के आरक्षणाच्या घटनात्मक मर्यादेचा मुद्दाही यावेळी उपस्थित केला. ईडब्लूएस आरक्षणामुळे एकूण आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांपेक्षा अधिक झालीय. या निर्णयाच्या वैधतेला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आलं होतं. मात्र, विशिष्ट आणि स्वतंत्र वर्गासाठी घटनात्मक आधारावर ५० टक्क्यांच्या मर्यादेपलीकडेही अपवादात्मक आरक्षण देता येऊ शकतं, असं सर्वोच्च न्यायालयानं याआधीच स्पष्ट केल्याचं त्यांनी यावेळी कोर्टाला सांगितलं.

त्यामुळे ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ही प्रत्येक परिस्थितीत पूर्णपणे अपरिवर्तनीय नसून, विशिष्ट घटनात्मक परिस्थितीत त्यापलीकडेही जाण्याची तरतूद कायद्यानं शक्य असल्यानं मराठा आरक्षणालाही त्या तत्त्वाचा आधार मिळू शकतो, या महत्त्वाच्या मुद्द्यावर राज्य सरकारनं मराठा आरक्षणाचं समर्थन करताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिलं. मुंबई उच्च न्यायालयानं हा युक्तिवाद ऐकून घेत मराठा आरक्षणासंदर्भातील पुढील सुनावणी २ सप्टेंबरपर्यंत तहकूब केलीय.

शुक्रे आयोगानं ऐतिहासिक परिस्थितीचा दिलेला आढावा योग्यच - मराठा समाजाच्या मागासलेपणाच्या प्रश्नावर युक्तिवाद करताना राज्य सरकारनं साल १९५६ पूर्वी मध्य विदर्भ आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये मराठा समाजाला मागास मानलं जात होतं. या दाव्याला सिद्ध करताना त्याबाबतच्या ऐतिहासिक नोंदींचा दाखलाही दिला. या ऐतिहासिक परिस्थितीचा विचार शुक्रे आयोगानं केला होता. त्यामुळे मराठा समाजाच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाबाबत शुक्रे आयोगानं काढलेले निष्कर्ष अगदी योग्य असल्याचा दावाही यावेळी राज्य सरकारनं हायकोर्टापुढे केला.

मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ राज्य सरकारचा जोरदार युक्तिवाद - फेब्रुवारी २०२४ मध्ये सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या



मागास ठरवत मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचा राज्य सरकारनं निर्णय घेतलाय. हे आरक्षण देताना राज्य सरकारनं एकूण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली असून घटनाबाह्य मराठा आरक्षण कायदा रद्द करण्यात यावा यासाठी मुंबई उच्च न्यायालयात विविध याचिका करण्यात आल्यात. याशिवाय मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थही हायकोर्टात काही याचिका दाखल झाल्या आहेत. या याचिकांवर सुनावणी घेण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानं एक विशेष पूर्णपीठ स्थापन करण्यात आलंय. या याचिकांवर सध्या प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती संदीप मारणे आणि न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार यांच्या पूर्णपीठासमोर सुनावणी सुरू आहे.

# भारतीय शिक्षणव्यवस्थेचे भयान वास्तव की पालकांच्या मानसिकतेचा बदलता आरसा



माणसाचा जन्मच समस्यातून झालेला असतो. त्यामुळे माणूस म्हटलं की समस्या असणारच. माणूस आणि समस्यांचे नाते अतूट आहे. जोपर्यंत जीवन आहे, तोपर्यंत लहान-मोठ्या अडचणी आणि संघर्ष माणसाच्या मागे असतातच. ही एक नैसर्गिक आणि अटळ बाब आहे, जिथे प्रत्येक व्यक्तीला कधी ना कधी वेगवेगळ्या आव्हानांचा सामना करावाच लागतो. जगात कितीही समस्या किंवा प्रश्न असले, तरी त्या सर्वांची उत्तरे शिक्षणामध्येच दडलेली आहेत. शिक्षण हीच सर्व प्रकारच्या विकासाची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात त्यादिशेने काम करणे अत्यंत आवश्यक आहे.

समाजात आई-वडिलांना देवाचे स्थान दिले जाते. आई-वडिलांएवढेच श्रेष्ठ स्थान कोणाचे असेल, तर ते गुरुजनांचे आहे. प्रत्येक माणसामध्ये अथांग शक्यता, क्षमता असतात. गुरु या बीजरूपी शक्तीला अंकुरित करतात. माणसाला अनेकदा स्वतः मधील शक्तीची जाणीव नसते. गुरु त्याच्या मनात ती जाणीव निर्माण करतात आणि त्याला आत्मविश्वास देतात. आत्मविश्वासाशिवाय आयुष्यात काहीही करू शकत नाही. ज्या समाजात शिक्षकांना आणि गुरुजनांना योग्य मान-सन्मान दिला जातो, तोच समाज प्रगतिशील बनतो आणि पुढे जातो. उत्तम शिक्षण माणसाला केवळ नोकरी शोधणारा नाही, तर नोकरी देणारा आत्मनिर्भर बनविते. शिक्षण हे ओझे नव्हे, आनंद असावा. मुलांवर अभ्यासाचे ओझे न लादता शिक्षण हा आनंददायी प्रवास बनविला पाहिजे. करिअरमध्ये यशस्वी होण्यासाठी पाठांतरापेक्षा स्वतःच्या आवडीच्या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करायला पाहिजे.

पण देशातील शिक्षण व्यवस्थेचे धक्कादायक वास्तव निती आयोगाच्या अहवालातून समोर आले आहेत. त्यामुळे भारतातील शालेय शिक्षण व्यवस्थेसमोर दोन मोठी आव्हाने उभी ठाकली आहेत. एकीकडे प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेणा-या प्रत्येक दहा विद्यार्थ्यांपैकी सुमारे चार विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचत नाहीत, तर दुसरीकडे २०१७-१८ ते २०२२-२३ या पाच वर्षांत देशातील शाळांची संख्या सुमारे ९२ हजारांनी कमी झाली आहे. याहून धक्कादायक म्हणजे, एक लाखांहून अधिक शाळा एक शिक्षकी तर ७,९९३ शाळांमध्ये एकही विद्यार्थी नाही. विद्यार्थी संख्येमुळे शाळांची संख्या कमी झाली नसून कमी पटसंख्येच्या शाळांचे विलीनीकरण, शाळांचे पुनर्गठन आणि एकात्मिक शाळा उभारण्याच्या धोरणामुळे झाली असल्याचे निती आयोगाच्या शालेय शिक्षणावरील अहवालात नमूद करण्यात आले आहे.

देशात आज १४.७१ लाख शाळांमध्ये २४.६९ कोटींहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक स्तरावर शिक्षणाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात वाढली असली, तरी माध्यमिक आणि विशेषतः उच्च माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांना टिकवून ठेवणे ही शिक्षण व्यवस्थेची सर्वात मोठी कसोटी ठरत माध्यमिक स्तरावर हे प्रमाण थेट ५८.४ टक्क्यांवर घसरते. म्हणजेच प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० टक्के विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचत नाहीत.

विद्यार्थी गळतीचे मुख्य कारण म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा खर्च प्राथमिक शिक्षणापेक्षा तीन ते पाच पट अधिक आहे. शिक्षणाचा हक्क कायद्याचा लाभ माध्यमिक शिक्षणाला नसल्याने पालकांना शुल्क, परीक्षा शुल्क, प्रवास आणि इतर खर्च करावा लागतो. याशिवाय, शाळेबाहेर असलेल्या किशोरवयीन मुलांपैकी ३१ टक्के रोजगारात आहेत. २५ टक्के घरगुती जबाबदा-या सांभाळतात. मुलींमध्ये अल्पवयीन विवाह आणि स्वच्छता सुविधांचा अभाव हीही गळतीची कारणे आहेत.

देशाच्या तुलनेत महाराष्ट्राचे चित्र काय सांगते? उच्च प्राथमिक ते माध्यमिक स्तरावर विद्यार्थ्यांचे संक्रमण प्रमाण ९८.४ टक्के असून ते देशातील सर्वोत्तम राज्यांपैकी एक आहे. म्हणजेच आठवीपासून दहावीपर्यंत विद्यार्थी टिकवून ठेवण्यात महाराष्ट्राची कामगिरी चांगली आहे. मात्र, दुसरीकडे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर ३७:१ आहे. राष्ट्रीय निकषांच्या तुलनेत हे प्रमाण जास्त मानले जाते. देशातील शाळांची रचना असमतोल असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकतृतीयांशपेक्षा अधिक शाळांमध्ये ५० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत. त्यामुळे शाळा कमी झाल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या एकात्मिक शाळा व शाळा समूह उभारण्याची शिफारस करण्यात आली आहे. यामुळे विज्ञान प्रयोगशाळा, वाचनालय, संगणक सुविधा व विषयतज्ज्ञ शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे.

ज्या शाळांमध्ये विद्यार्थी शिकत आहेत, त्या शाळांचा दर्जा काय आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय भारतीय शिक्षणव्यवस्थेचे खरे शिक्षणव्यवस्थेची चर्चा झाली की आपण प्रवेशदर, गळती, शिक्षकांची संख्या आणि नवीन शाळा या आकडेवारीवर भर देतो. केंद्र सरकारने प्रसिद्ध केलेल्या युडाईज २०२५-२६ अहवालातही अशीच अनेक सकारात्मक चित्रे दिसतात. शाळाबाह्य विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे, शिक्षक-विद्यार्थी गुणोत्तर सुधारले आहे, डिजिटल सुविधा वाढल्या आहेत आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० योग्य दिशेने जात असल्याचे चित्र समोर येते; पण या अहवालात दडलेला एक आकडा मात्र गंभीर विचार करायला भाग पाडतो.

गेल्या दोन वर्षांत सरकारी शाळांमधून तब्बल ८६ लाख विद्यार्थी कमी झाले, तर जवळपास तेवढेच विद्यार्थी खासगी शाळांकडे वळले. ही केवळ आकडेवारी नाही; हा भारतीय पालकांच्या बदलत्या मानसिकतेचा आरसा आहे. आज बहुतेक पालकांची एक अशी धारणा झाली आहे की, 'मुलाचे भविष्य घडवायचे असेल तर खाजगी शाळाच हवी.' ही धारणा पूर्णपणे खरी आहे की नाही, यावर मतभेद असू शकतात; पण ही धारणा तयार झाली आहे, हे नाकारता येत नाही. विशेष म्हणजे, ही केवळ श्रीमंत कुटुंबांची निवड राहिलेली नाही. ग्रामीण भागातील, शेतकरी, कामगार आणि निम्न मध्यमवर्गीय कुटुंबेही मोठ्या आर्थिक त्यागाने मुलांना खाजगी शाळेत पाठवत आहेत. कारण त्यांना वाटते की, शिक्षण हा खर्च नाही; तर मुलांच्या भविष्याची गुंतवणूक आहे. याचवेळी युडाईज अहवालातील आणखी काही आकडे आपल्याला अस्वस्थ करतात.

प्राथमिक शिक्षणात प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांपैकी केवळ ५१.९ टक्के विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचतात, तर माध्यमिक शिक्षणाचा सकल प्रवेशदर अजूनही ७१.७ टक्के आहे. म्हणजेच, लाखो विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवासात मधेच मागे पडतात. भारताने मुलांना शाळेत आणण्यात मोठे यश मिळवले आहे; पण त्यांना दर्जेदार शिक्षण देऊन शेवटपर्यंत टिकवून ठेवण्यात अजूनही मोठी तफावत आहे. गेल्या तीन दशकांत शिक्षणाचा हक्क कायदा, सर्वशिक्षा अभियान, मध्यान्ह भोजन योजना आणि समग्र शिक्षा यांसारख्या योजनांमुळे प्राथमिक शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचले. त्यामुळे आजचा प्रश्न 'मुलांना शाळेत कसे आणायचे?' हा राहिलेला नाही.

आजचा खरा प्रश्न आहे, 'शाळेत येणा-या प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळते का?' कारण शाळेत प्रवेश मिळणे आणि चांगले शिक्षण मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. याच ठिकाणी अहवालाची मर्यादा दिसून येते. हा अहवाल शाळांची संख्या, शिक्षक, संगणक, इंटरनेट, प्रयोगशाळा आणि इतर सुविधा यांचे उत्कृष्ट चित्र मांडतो; पण विद्यार्थी किती समजून शिकतो? त्याच्यात चिकित्सक विचार विकसित होतो का? वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो का? रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये मिळतात का? या प्रश्नांची उत्तरे देत नाही. त्यामुळे हा अहवाल शिक्षणव्यवस्थेच्या प्रशासकीय स्थितीचे मोजमाप करतो; शिक्षणाच्या गुणवत्तेचे नाही.

सरकारी शाळांची संख्या कमी होण्यामागे शाळांचे एकत्रीकरण हेही एक कारण सांगितले जाते. संसाधनांचा कार्यक्षम वापर हा त्यामागील उद्देश असला, तरी ग्रामीण आणि दुर्गम भागात त्याचे वेगळे परिणाम होतात. गावातील शाळा बंद झाली की, लहान मुलांना अधिक अंतर पार करावे लागते. अनेक मुलींसाठी हेच अंतर शिक्षण सोडण्याचे कारण ठरते. त्यामुळे शाळांचे नियोजन करताना केवळ खर्चाचा विचार पुरेसा नाही; सामाजिक परिणामांचा विचारही तितकाच आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ने कौशल्याधारित, अनुभवाधारित आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षणाची दिशा दिली आहे. परंतु कोणतेही धोरण कागदावर यशस्वी ठरत नाही; ते विद्यार्थ्यांच्या आयुष्यात बदल घडवते तेव्हाच त्याचे यश सिद्ध होते. म्हणूनच शिक्षणाचे मूल्यांकन केवळ प्रवेशदर, गळती किंवा पायाभूत सुविधांवर न करता विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या गुणवत्तेवर, रोजगारक्षमतेवर आणि व्यक्तिमत्त्व विकासावर झाले पाहिजे.

आज भारतीय शिक्षणव्यवस्थेसमोरचा सर्वांत मोठा प्रश्न 'सरकारी शाळा किती आहेत?' हा नाही; तर 'सरकारी शाळांवर समाजाचा विश्वास किती आहे?' या अहवालाने आपल्यासमोर एक कठोर वास्तवही ठेवले आहे. सरकारी शाळांमधून लाखो विद्यार्थी बाहेर पडत आहेत. त्यामुळे आजचा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा नाही की किती विद्यार्थी शाळेत आहेत? तर तो हा आहे की, ज्या शाळांमध्ये विद्यार्थी आहेत, त्या शाळांवर पालकांचा विश्वास अजूनही टिकून आहे का? या प्रश्नाचे उत्तर शोधल्याशिवाय भारतीय शिक्षणव्यवस्थेचे खरे चित्र समोर येणार नाही.

---

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७४९८८८५०६१**

## संपादकीय...

### आरक्षण हा घटनात्मक हक्क; सामाजिक न्यायाच्या तत्त्वाशी तडजोड नको

भारतीय राज्यघटना ही सामाजिक न्याय, समानता आणि बंधुता या मूल्यांवर उभी आहे. शतकानुशतके सामाजिक भेदभाव आणि वंचिततेचा सामना करणाऱ्या अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संविधानाने आरक्षणाची तरतूद केली. हे आरक्षण कोणाची कृपा किंवा दान नसून घटनात्मक अधिकार आहे. अशा पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात एससी-एसटी आरक्षणात क्रीमी लेयर लागू होत नसल्याचे स्पष्ट केले आहे. ही भूमिका सध्या अस्तित्वात असलेल्या घटनात्मक आणि न्यायालयीन चौकटीवर आधारित असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे की, एससी-एसटी आरक्षणावर क्रीमी लेयर लागू असल्याचे सर्वोच्च न्यायालयाच्या कोणत्याही निर्णयात स्पष्टपणे सांगितलेले नाही. त्यामुळे अशा स्वरूपाचा नियम न्यायालयाच्या आदेशाशिवाय किंवा कायद्यातील बदलाशिवाय लागू करता येणार नाही. सरकारने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या यादीत बदल करण्याचा अधिकार केवळ संसदेकडे आहे. राज्य सरकार, न्यायालय किंवा इतर कोणतीही संस्था या यादीत बदल करू शकत नाही. ही बाब भारतीय संविधानात स्पष्टपणे नमूद करण्यात आली आहे. क्रीमी लेयर ही संकल्पना १९९२ मधील मंडल आयोग प्रकरणानंतर इतर मागासवर्गीय (ओबीसी) आरक्षणाच्या संदर्भात विकसित झाली. त्यामागील उद्देश आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या सक्षम घटकांना आरक्षणाच्या लाभातून वगळणे हा होता. मात्र तोच निकष एससी-एसटी आरक्षणाला लागू होतो का, हा स्वतंत्र घटनात्मक प्रश्न आहे. एससी-एसटी समाजावरील ऐतिहासिक अस्पृश्यता, सामाजिक बहिष्कार आणि जातीय भेदभाव हे केवळ आर्थिक निकषांनी मोजता येत नाहीत. म्हणूनच त्यांच्या आरक्षणाची घटनात्मक भूमिका ओबीसी आरक्षणापेक्षा वेगळी आहे, असे अनेक घटनातज्ज्ञांचे मत राहिले आहे. याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे की आरक्षणाचा लाभ अधिक गरजूंपर्यंत पोहोचण्यासाठी क्रीमी लेयरचा विचार व्हावा. हा मुद्दा सार्वजनिक चर्चेचा विषय असू शकतो. मात्र अशा प्रकारचा बदल करण्यासाठी घटनात्मक प्रक्रिया, सखोल सामाजिक-आर्थिक अभ्यास आणि कायदेशीर आधार आवश्यक आहे. भारतीय लोकशाहीत न्यायालय, संसद आणि कार्यपालिका या तिन्ही संस्था आपापल्या घटनात्मक मर्यादेत कार्य करतात. त्यामुळे आरक्षणासारख्या संवेदनशील विषयावर निर्णय घेताना घटनात्मक संतुलन राखणे अत्यंत आवश्यक आहे. आरक्षणाचा प्रश्न हा समाजात तेढ निर्माण करण्याचा विषय नसून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा विषय आहे. या विषयावर कोणतेही विधान किंवा निर्णय घेताना समाजात गैरसमज निर्माण होणार नाहीत, याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. आजही देशातील अनेक भागांत अनुसूचित जाती-जमातींवरील भेदभाव, अत्याचार आणि सामाजिक विषमता पूर्णपणे संपलेली नाही. त्यामुळे सामाजिक वास्तव लक्षात घेऊनच आरक्षण धोरणाचा विचार होणे आवश्यक आहे. आरक्षणाचा उद्देश केवळ नोकरी किंवा शिक्षणातील जागा देणे नाही, तर समान संधी उपलब्ध करून देत संविधानाने अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडवून आणणे हा आहे. केंद्र सरकारच्या प्रतिज्ञापत्रामुळे सर्वोच्च न्यायालयातील या प्रकरणाला नवीन दिशा मिळाली आहे. अंतिम निर्णय न्यायालय देईल; तोपर्यंत समाजाने संयम, संविधानावरील विश्वास आणि कायद्याचा आदर राखणे आवश्यक आहे. भारताची लोकशाही संविधानामुळे मजबूत आहे. संविधान सर्वोच्च आहे आणि त्यातील सामाजिक न्यायाची तत्त्वे हीच देशाच्या प्रगतीची खरी ताकद आहे. आरक्षण हा घटनात्मक हक्क आहे. त्यावर कोणताही निर्णय घेताना संविधानाची भावना, सामाजिक वास्तव आणि न्याय या तिन्ही गोष्टींचा समतोल राखला गेला पाहिजे. सामाजिक सलोखा, समानता आणि बंधुता जपणे हीच आजची सर्वात मोठी गरज आहे. जय भीम! जय संविधान!

# देशाला मतदारसंघ पुनर्रचनेची गरज नसुन; मोठ्या प्रमाणात होत असलेल्या भेसळयुक्त पदार्थांवर नियंत्रण आणण्याची गरज

फक्त राजकारणासाठी व स्वतः च्या स्वार्थासाठी आरोग्याशी खेळ खेळू नये.सर्वप्रथम देशाच्या जनतेच्या भविष्याचा व आरोग्याचा विचार सरकारने करावा. नंतर राजकारणाचा विचार करावा.''आरोग्य हिच संपत्ती'' असे म्हटल्या जाते परंतु यावरच सरकारकडून घणाघाती प्रहार होत आहे. कारण आज देशात सर्वच वस्तूमध्ये व पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याचे दिसून येते आणि याचा सरळ परिणाम देशातील जनतेच्या आरोग्यावर होत आहे या संपूर्ण घटना सरकार उघड्या डोळ्यांनी पाहत आहे.देशात लोकसभा सदस्य,राज्यसभा सदस्य, विधानसभा सदस्य,विधानपरिषद सदस्य,जिल्हापरिषद सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, महानगरपालिका सदस्य, सरपंच इत्यादी अनेक लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी देशासह राज्यात, ग्रामीण भागात,शहरी भागात आहेत व यांच्या सोबतीला सरकारी यंत्रणा म्हणून मोठ्या प्रशासनाची साथ असतांना व राजकारण्यांचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची गरजच काय? देशात लोकसंख्येच्या प्रमाणात शाळा नाही, विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षक नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात हॉस्पिटल नाहीत, लोकसंख्येच्या प्रमाणात नोकऱ्या नाहीत, लोकसंख्या प्रमाणात नागरी सुविधा नाहीत.परंतु राजकीय पुढाऱ्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात आमदार, खासदार,मंत्री पाहिजे ही कसली लोकशाही म्हणावी!याला तर हुकूमशाही म्हणावी लागेल.देशात अनेक ज्वलंत, गंभीर आणि जटील समस्या आहेत व ते प्रत्येक माणसाच्या आरोग्याशी निगडित आहेत.ह्या संपूर्ण गोष्टी सरकारच्या डोळ्यासमोर असतांना सुध्दा सरकारला व राजकीय पुढाऱ्यांना फक्त आपले स्वार्थ साधण्यासाठी परिसीमन वाढविण्यावर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. आज आरोग्याशी निगडित अनेक गंभीर समस्या देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे आहेत.आपण देशातील दुध उत्पादनाचा विचार केला तर दररोज देशात १४ कोटी लिटर दुधाचे संकलन होते.परंतु देशात दूधाचा खप दररोजचा ६४ कोटी लिटर होतो. म्हणजे देशात ५० कोटी लिटर दूध आले कोठून याची सरकारने कधीच चौकशी केली नाही आणि चौकशी करण्याला महत्त्व सुध्दा दिले नाही. परंतू मतदारसंघ पुनर्रचना करण्यासाठी व महिला आरक्षणासाठी सरकारकडून एडीचोटीचा जोर लावण्यात येत असून प्रयत्न सुरू आहे.आज ८० टक्के दूधाचा वापर मुलांच्या आहाराच्या रूपात वापरल्या जातो आणि प्रत्येक आईवडील आपल्या मुलांच्या आरोग्यासाठी दूधाचा वापर करतोच.देशात विकल्या जाणाऱ्या दुधाचा विचार केला तर ८० टक्के दूध बालकांच्या आहारात वापरल्या जाते व २० टक्के दूधाचा वापर सर्वसामान्यांनसाठी केला जातो.यावरून आपण समजू शकतो की, लहान मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे.दूधातील भेसळ म्हणजे देशातील बालक,आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल.कारण दूधापासून शेकडो पदार्थ तयार होतात आणि एवढे दुध येतेच कोठून असा प्रश्न आज जनतेसमोर उपस्थित होत आहे. राजकीय पुढारी आपल्या स्वार्थासाठी मतदार संघ फेररचना करून राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या तयारीत आहे.सध्या देशात ५४३ लोकसभा सदस्य आहेत यात फेररचना करून ८५० करण्याच्या तयारीत सत्ताधारी पक्ष आहेत.सरकार महिलांना ५४३ संसद सदस्यामध्ये आरक्षण देण्यास तयार नाही.परंतु मतदार संघ वाढवून महिला आरक्षण देण्यावर जास्त भर देत आहे. याकरीता सरकार फोडाफोडीचे राजकारण करू बहुमताचा आकडा तयार करण्यासाठी संपूर्ण ताकदीनिशी सरकार प्रयत्न करीत आहे.विधेयक पारीत करण्यासाठी सध्याच्या ५४३ खासदारांच्या संख्याबळानुसार दोन तृतीयांश म्हणजे सरकारला लोकसभेत ३६० खासदारांची गरज आहे, सध्या राज्यसभेत २४५ खासदार आहेत बहुमतासाठी राज्यसभेत १६४ सांसद सदस्यांची गरज आहे.परंतु आज देशाला मतदारसंघ पुनर्रचना करण्याची काहीच गरज नाही. कारण देशात पुर्वीपासूनच लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधीं व सरकारचा प्रशासकीय मोठा जखीडा आहे. त्यामुळे राजकारणाचा व प्रशासनाचा एवढा मोठा फौजफाटा असतांना देशात मतदारसंघ पुनर्रचनेची तिळमात्र गरजेचं नाही.जर मतदारसंघाची पुनर्रचना झाली तर देशाच्या १४५ कोटी जनतेवर अरबो रूपयांचा बोजा पडेल व हा संपूर्ण पैसा राजकीय पुढाऱ्यांच्या घशात जाईल. आज भेसळयुक्त पदार्थाने देशाच्या १४५ जनतेचे आरोग्य धोकादायक स्थितीत आले आहे.यामुळे देशाच्या जनतेला अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. आज भेसळयुक्त पदार्थ किंवा वस्तू यांचा जनुकाय खुला बाजार मांडला की असे दिसून येते.आज महाराष्ट्रातील भेसळयुक्त पदार्थ किंवा अन्नधान्य यावर माननीय श्री तुकाराम मुंढे यांनी धाडी टाकून व कठोर कारवाई करून भेसळ करणाऱ्यांची झोप उडविली आहे आणि आज तुकाराम मुंढेमुळे देशातील अनेक राज्य सरकारांना जाग आल्याचे दिसून येते. ह्या घटना अगोदरच सरकारच्या कशा काय लक्षात आल्या नाहीत? असे अनेक प्रश्न आज १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होतात.यावरून आपण समजू शकतो की, मुलांचे आरोग्य किती धोकादायक श्रेणीमध्ये असावे याचा अंदाज आपण लावू शकतो.दूधातील भेसळ म्हणजे देशातील मुलं, आबालवृद्ध व सर्वसामान्यांसाठी स्लोपॉयझनच म्हणावे लागेल.रोज सकाळी उठल्यावर आपण जे दूध पितो ते शुद्ध आहे की भेसळयुक्त? याची खातरजमा खरं तर कुणीच करत नाही. मात्र या दुधात भेसळ असण्याची शक्यताच जास्त आहे. कारण देशात उत्पादित होणाऱ्या दुधाच्या चौपट प्रमाणात विक्री केली जाते. आपल्या देशात दररोज १४ कोटी लिटर दुधाचं उत्पादन होतं.परंतू देशात ६४ कोटी लिटर दूध रोज विकलं जात असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने दिली आहे. देशात रोज अंदाजे ५० कोटी लिटर भेसळयुक्त दूध विकलं जातं, असा दावा ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाचे सदस्य मोहनसिंग अहलुवालिया यांनी केला आहे. देशातील ६८.७ टक्के दूध हे अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाच्या निकषांवर नापास झालं आहे. डिसेंबर २०१६ मध्ये सुप्रीम कोर्टाने केंद्राला दूध भेसळीची तातडीने चौकशी करण्याचे आदेश दिला होता. त्यावर सरकारने अर्थमंत्री अरुण जेटलींच्या अध्यक्षतेखाली समिती सुध्दा नेमण्यात आली होती. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या समितीची एकही बैठक झाली नसल्याचे सांगितले जाते आणि आतातर यावर सरकार लक्ष देण्यास नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल.दुग्धजन्य पदार्थांच्या बाबतीत ऐवढी भेसळ होत आहे की आपण त्याची कल्पना सुद्धा करू शकत नाही. आपण सरासरी विचार केला तर सर्वसाधारण १ लिटर फुल क्रीम दूधापासून खवा साधारणता २०० ग्रॅमच्या जवळपास तयार होतो. त्याचप्रमाणे पनीरचा विचार केला तर साधारणतः १ लिटर फुल क्रीम (म्हशीच्या) दुधापासून साधारणपणे १५० ते २०० ग्रॅम पनीर तयार होते.परंतु यांच्या तुलनेत ५० पटीने खवा व पनीर आपल्याला बाजारात दिसून येते.देशात दररोज ५५ लाख कीलो खवा तयार होतो तर दररोज १ कोटी ५० लाख किलो पनीरचे वापर आणि उत्पादन केले जाते. म्हणजे आपल्याजवळ जेवढे दूध नाही त्याच्या कितीतरी पटीने देशात खवा आणि पनीरचे उत्पादन केल्या जाते याचाच अर्थ असा की, देशात दूध,पनीर,खवा आणि दुधापासून तयार होणारे पदार्थ यामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत आहे आणि सरकारने डोळ्यावर पट्टी बांधून ठेवली आहे.यावरून लक्षात येते की, सरकार सर्वसामान्यांनच्या आहाराकडे व आरोग्याकडे लक्ष न देता परिसीमनवर जास्त भर देत असल्याचे दिसून येते. देशात सर्वच बाबतीत भेसळचे प्रमाण वाढले आहे आणि विद्यार्थ्यांच्या बाबतीत विचार केला तर जंकफूडमुळे त्यांचे आरोग्याला धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.यामुळे नवीन-नवीन आजार उदयास येत आहे यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.त्याचप्रमाणे देशात वाढता भ्रष्टाचार,महागाई, बेरोजगारी, पेपर फुटी,जेन-झी चे प्रश्न, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां,शैक्षणिक धोरण, बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेली पुरपरिस्थिती अशा गंभीर समस्या देशापुढे असतांना सध्याच देशाला मतदारसंघ पुनर्रचनेची गरज नसून एक सूदृढ,निरोगी आणि भ्रष्टव्यवस्था मुक्त करण्याची गरज आहे.त्यासाठी सरकारने,पक्ष-विपक्षांनी एकत्र येऊन काम करण्याची नितांत गरज आहे. जय हिंद!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं. ९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# प्रत्यक्ष लेखकाच्या भेटीने यशवंत विद्यालयात रंगली 'कौतुकाची थाप'!

## शिक्षणामुळे माणसाचा विकास आणि प्रगती होते- आ. विक्रम काळे

### आ. विक्रम काळे व लेखक आयुब पठाण लोहगावकर यांच्या उपस्थितीत विद्यार्थी-शिक्षक संवाद! 'मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये' यासाठी आ काळे यांचा विशेष उपक्रम

**बीड/प्रतिनिधी :** माणसाला स्वतः च्या पायावरती उभं करण्याचे काम शिक्षण करतंय. शिक्षण हे तुमच्या जगण्याचं साधन आहे, आपल्या जीवनामध्ये भरारी देण्याचं काम करतंय. शिक्षणामुळे माणसाचा विकास आणि प्रगती होते. त्यामुळे चांगलं शिका, चांगला अभ्यास करा, मेहनत करा, नेहमी खरं बोला आणि शाळेत रोज उपस्थित राहावे असे आवाहन शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी बीड शहरातील यशवंत विद्यालयात लेखक आपल्या भेटीला या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गणेश वाघ हे होते. तर व्यासपीठावर लेखक आयुब पठाण लोहगावकर, संस्थेचे सचिव नामदेवराव वाघ, संस्थाचालक शिक्षण महासंघाचे जिल्हाध्यक्ष दीपक दादा घुमरे, रवींद्र खोड, महेश घरत, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक मधुकर धुमाळ आदी मान्यवर उपस्थित होते.

बीड शहरातील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित यशवंत विद्यालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच शिक्षक आमदार विक्रम (बप्पा) काळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी अनोखा आणि प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रम बुधवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते



प्रतिमापूजनाने करण्यात आली. त्यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ व सचिव नामदेवराव वाघ यांनी आ. विक्रम काळे, लेखक आयुब पठाण लोहगावकर यांच्यासह उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

मान्यवरांच्या स्वागत समारंभा नंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक गणेश वाघ यांनी केले. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी निवडण्यात आलेल्या शाळांच्या विशेष उपक्रमात यशवंत विद्यालयाचा समावेश करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच गणेश वाघ यांनी यावेळी आमदार विक्रम काळे यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि शिक्षकहिताच्या कार्याचा गौरवही आपल्या प्रस्ताविकात केला. त्या नंतर कार्यक्रमात उपस्थित शिक्षक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी मराठी भाषेच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त केली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, या वर्षी ''दहावीच्या बोर्ड परीक्षेत राज्यात तब्बल ९४ हजार ४०० विद्यार्थी मराठी विषयात अनुत्तीर्ण होतात, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. ज्या मातृभाषेत आपण वाढलो, त्या मराठी विषयाला इंग्रजी आणि गणिताइतकेच महत्त्व दिले पाहिजे. महाराष्ट्रातील मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये, यासाठीच हा उपक्रम सुरू केला आहे.''मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील ४० शाळांमध्ये तसेच बीड शहरातील सात शाळांमध्ये हा विशेष उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती आ. काळे यांनी दिली. पाठ्यपुस्तकातील लेखकाला प्रत्यक्ष भेटण्याची संधी विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभराची अविस्मरणीय आठवण ठरेल, असेही त्यांनी सांगितले. यावेळी आ. काळे यांनी शिक्षकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवरही भाष्य केले. जुनी पेन्शन योजना, शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा, अनुदानाचे पुढील टप्पे तसेच शाळांचे डिजिटलायझेशन या विषयांवर शासनस्तरावर पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

शिक्षकांना अध्यापनाशिवाय इतर अशैक्षणिक कामांपासून मुक्त करण्यासाठी शिक्षणमंत्र्यांसोबत बैठक झाल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. यशवंत विद्यालयाच्या विकासासाठी यापूर्वी संगणक व ग्रंथालयासाठी पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली असून, भविष्यात विद्यालय डिजिटल करण्यासाठीही प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. शेवटी बोलताना शिक्षण माणसाला स्वतः च्या पायावरती उभं करण्याचे काम करतंय. शिक्षण हे तुमच्या आमच्या जगण्याचं साधन आहे, आपल्या जीवनामध्ये भरारी देण्याचं काम करतंय. त्यामुळे चांगलं शिका, चांगला अभ्यास करा, मेहनत करा, नेहमी खरं बोला आणि शाळेत रोज उपस्थित राहा असं आवाहन करत विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शेळके सर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. लेखकाची प्रत्यक्ष भेट, कथा-कथन आणि प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे यशवंत विद्यालयात 'कौतुकाची थाप' हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी आनंददायी, संस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरला.

इयत्ता चौथीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील 'कौतुकाची थाप' या पाठाचे लेखक आयुब पठाण लोहगावकर यांनी प्रत्यक्ष विद्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. विविध कथा, गोष्टी आणि उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांना अक्षरशः खिळवून ठेवले. 'जुनं ते सोनं, नवं ते हवं'चा संदेश लेखक आयुब पठाण लोहगावकर यांनी आपल्या रसाळ आणि ओघवत्या शैलीत 'कौतुकाची थाप' या पाठाचे विश्लेषण केले. विविध उदाहरणे व गोष्टी सांगत बालमनावर चांगले संस्कार, सकारात्मक प्रेरणा आणि आत्मविश्वास निर्माण व्हावा, यासाठी हा पाठ लिहिण्यामागील उद्देश स्पष्ट केला. 'जुनं ते सोनं आणि नवं ते हवं' या विचारातून त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील चांगल्या गोष्टी स्वीकारण्याचा संदेश दिला. पाठ्यपुस्तकात ज्या लेखकाचा परिचय विद्यार्थ्यांनी वाचला, तोच लेखक आज प्रत्यक्ष आपल्या समोर येऊन आपल्या पाठामागची भूमिका सांगत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. लेखकाच्या कथाकथनाने विद्यार्थ्यांचे बालमन जिंकले.

## विविध वृत्त...

### घरकुलाच्या मस्टरचे पैसे काढण्यासाठी ३ हजारांची लाच, बनसारोळा ग्रामपंचायत कार्यालयाचा ग्रामरोजगार सेवक एसीबीच्या जाळ्यात



**केज/प्रतिनिधी :** पीएम घरकुल योजनेअंतर्गत मस्टरचे पैसे काढून देण्यासाठी प्रति मस्टर १०० रुपये याप्रमाणे ३० मस्टरसाठी तीन हजार रुपयांची लाच मागणाऱ्या बनसारोळा ग्रामपंचायतीच्या ग्रामरोजगार सेवकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या एसीबी पथकाने रंगेहाथ पकडले. गोविंद सोपान गोरे वय ५० वर्षे, रा. बनसारोळा, ता. केज, जि. बीड असे कारवाई करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीएम घरकुल योजनेअंतर्गत मस्टरचे पैसे काढून देण्यासाठी गोरे यांनी तक्रारदाराकडे प्रति मस्टर १०० रुपये याप्रमाणे ३० मस्टरसाठी एकूण तीन हजार रुपयांची लाच मागितली होती. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारीची पडताळणी केली.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या पथकाने सापळा रचला. बनेश्वर मंदिराजवळ तक्रारदाराकडून तीन हजार रुपयांची लाच स्वीकारताना गोविंद गोरे यांना पथकाने रंगेहाथ पकडले.या कारवाईमुळे ग्रामपंचायत वर्तुळात खळबळ उडाली आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीडचे उपअधीक्षक सोपान चिटमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली एसीबीच्या पथकाने केली. या प्रकरणी युसुफवडगाव पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### वरपगाव येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात , पोलीस पाटील अरुण गालफाडे यांच्याकडून शाळेस ५ हजार रुपयांची मदत




**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील वरपगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रस्तरीय शिक्षण परिषद अत्यंत उत्साहात संपन्न झाली. या परिषदेत शैक्षणिक गुणवत्तेचा दर्जा उंचावणे व विविध उपक्रमांचे नियोजन याबाबत सखोल चर्चा झाली. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती केंद्राचे केंद्रप्रमुख नखाते,सर्व केंद्रस्तरीय शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रज्जाक पठाण,गावचे पोलीस पाटील अरुण गालफाडे,सरपंच प्रतिनिधी वाल्मिक कांबळे, शिक्षणप्रेमी नागरिक बाळू गालफाडे यांची उपस्थिती होती. शिक्षणातील लोकसहभाग आणि शाळेच्या भौतिक व शैक्षणिक विकासाचे महत्त्व ओळखून गावातील शिक्षणप्रेमी पोलीस पाटील अरुण गालफाडे यांनी याप्रसंगी शाळेच्या विकासासाठी ५ हजार रुपयाची रोख मदत सुपूर्द केली.

त्यांच्या या दातृत्वाबद्दल केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व शिक्षकवृंद या सर्वांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या शिक्षण परिषदेच्या निमित्ताने शाळेतर्फे उपस्थित सर्व मान्यवर व शिक्षकांचे अतिशय उत्कृष्ट नियोजन करण्यात आले होते. शिक्षण परिषदेदरम्यान शिक्षकांनी विविध शैक्षणिक विषयांवर आपले विचार व अनुभव मांडले. कार्यक्रमास शिक्षक,विद्यार्थी,पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक पाटील यु.डी., घुले एस.व्ही.,एकशिंगे जी. जे.,शिंदे ए. ए.,शामल बनसोडे आदींनी परिश्रम घेतले.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेवर विशेष मुलाखत

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' संदर्भातील सविस्तर माहिती देणारी सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे यांची विशेष मुलाखत 'जय महाराष्ट्र' आणि 'दिलखुलास' या कार्यक्रमांमधून प्रसारित होणार आहे.'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात या मुलाखतीचा पहिला भाग मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री ८ वाजता दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर तसेच महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसारित होईल.'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत १२ ते १८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत (रविवार, दि. १६ ऑगस्ट वगळून) दररोज सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून प्रसारित होणार आहे. 'News On AIR' या मोबाईल ॲपवरही ही मुलाखत ऐकता येणार आहे.या मुलाखतीचे सूत्रसंचालन पूनम चांदोरकर यांनी केले आहे.

## भरदिवसा सोनार व्यावसायिकास अडवून सोन्या-चांदिचे दागिने लुटणारी टोळी निष्पन्न

### १ आरोपी अटक;६ लाख ९३ हजार ८०० रुपायाचा मुद्देमाल केला जप्त

**बीड/प्रतिनिधी :** भरदिवसा दुचाकीवरून जाणाऱ्या सोनार व्यावसायिकास अडवून सोन्या-चांदिचे दागिने लुटणारी टोळी निष्पन्न झाली असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका आरोपीला अटक करून आरोपीच्या ताब्यातील ६ लाख ९३ हजार ८०० रुपायाचा मुद्देमाल जप्त केला आहे. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांच्या पथकाने केली आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी रमेश उदावंत वय ४७ वर्षे, व्यवसाय सोनार, रा. हिवरसिंगा ता. जि. बीड हे निर्गुडी येथील आठवाडी बाजारात सोन्या-चांदिचे दागिने घेवून मोटरसायकल वरून हिवरसिंगा येथे जात असताना,सकाळी सुमारे ९-३०वाजण्याच्या सुमारास निर्गुडी-हिवरसिंगि रोडवर पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून आलेल्या अज्ञात इस्मानी त्यांची मोटरसायकल अडवून जबरदस्तीने त्यांच्या ताब्यातील सोन्या-चांदीचे दागिने लूटून नेहल्या बाबतची पाटोदा पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२३०/२०२६कलम ३०९(३),३(५)भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरील गंभीर गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांनी समांतर तपास सुरू केला.तांत्रिक विश्लेषण,गोपनीय



बातमीदाराकडून प्राप्त झालेली माहिती तसेच खबऱ्यांच्या मदतीने आरोपीचा शोध घेत असताना,सदरील गुन्ह्यातील रोहन उर्फ बॉबी संजय गुणवंत वय २४ वर्षे रा. शास्त्रीनगर, नाळवंडी नाका, बीड यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफट कार क्र. एमएच-१२जेएम - ४३००तसेच चोरीस गेलेला मुद्देमाल असे एकूण ६ लाख ९३ हजार ८०० रुपये किमतीचा मुद्येमाल हस्तगत करून जप्त करण्यात आला आहे.सदर गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध सुरू असून त्यांना लवकरच अटक करून त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. सदरची उल्लेखनीय कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत खुळे, यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोह/अशोक दुबाले,पोहे/सोमनाथ गायकवाड, पोह/बाळासाहेब सानप,पोह/मारुती कांबळे,पोहे/आसेफ शेख,पोअ/आश्विनकुमार सुरवसे, चापोअ/सिद्धेश्वर मांजरे यांनी केली आहे.

### उच्च शिक्षणासाठी वसतिगृह प्रवेशास अर्ज सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी ७ ते ३१ ऑगस्टदरम्यान ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन सहायक संचालक अभय अटकळ यांनी केले आहे. जिल्ह्यात मुला-मुलींसाठी प्रत्येकी १०० क्षमतेची दोन वसतिगृहे कार्यरत आहेत. येथे निवास, भोजन व शैक्षणिक साहित्याची मोफत सुविधा उपलब्ध आहे.

प्रवेशासाठी विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे. जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र बंधनकारक आहे. पालकांचे वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपेक्षा कमी असावे. बारावीनंतर उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना किमान ६० टक्के गुण आवश्यक आहेत. शिक्षण संस्थेच्या शहरात विद्यार्थी स्थानिक रहिवासी नसावा.

वेळापत्रकानुसार अर्ज स्वीकृती ७ ते ३१ ऑगस्ट, छाननी १ ते ७ सप्टेंबर होणार आहे. पहिली निवड यादीनुसार प्रवेशाची अंतिम मुदत १८ सप्टेंबर आहे. प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांसाठी दुसरी यादी २१ सप्टेंबरला प्रसिद्ध होईल. दुसऱ्या यादीतील प्रवेशाची अंतिम मुदत ३० सप्टेंबर आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hmasnew.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज करावेत. अधिक माहितीसाठी मुलींच्या वसतिगृहासाठी गृहपाल वृषाली बडे (९०२८२६११८३) व मुलांच्या वसतिगृहासाठी तिरुके सुरज (८३२९४४७४१०) यांच्याशी संपर्क साधावा, असेही त्यांनी कळविले आहे.

## वंचित बहुजन आघाडीचे नूतन प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे

**मुंबई / के. एच. हनवते :** वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी राजेंद्र निरंजन पातोडे यांची निवड झाल्यानंतर राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. परंतु महाराष्ट्रभर त्यांच्या नावाची चर्चा होत असून राजेंद्र पातोडे कोण आहेत..? हे जाणून घेऊयात.

संघटन उभारणी, विद्यार्थी चळवळ, सामाजिक आंदोलन, लेखक, पत्रकारिता आणि आंबेडकरी विचारांच्या प्रचार-प्रसारात सातत्याने कार्य करणारे राजेंद्र पातोडे यांनी गेल्या तीन दशकांहून अधिक काळ पक्षासाठी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत.

राजेंद्र पातोडे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील कराटे स्पर्धेत सुवर्णपदक पटकावल्यानंतर अकोल्यातील विविध दैनिकांमध्ये सुमारे नऊ वर्षे पत्रकार म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या राजकीय प्रवासाची सुरुवात १९९० मध्ये भारिप बहुजन महासंघाच्या अकोला येथील कृषीनगर शाखेचे अध्यक्ष म्हणून झाली. त्यानंतर २००० मध्ये जिल्हा प्रसिद्धीप्रमुख म्हणून त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी काम केले.

२००४ मध्ये अकोला जिल्हा युवक आघाडीचे पहिले जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पुढे २००९ आणि २०१२ मध्ये सलग दोन कार्यकाळ अमरावती विभागीय युवक अध्यक्ष म्हणून त्यांनी अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांमध्ये संघटन विस्ताराचे काम केले. २०१८ मध्ये पक्षाच्या सम्यक विद्यार्थी आंदोलनासाठी अमरावती, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यांचे संपर्कप्रमुख म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर प्रभावी नेतृत्व केले. विद्यार्थी चळवळीला नवी दिशा देत अनेक युवकांना संघटनेशी जोडण्याचे काम त्यांनी केले.

२०१९ च्या अकोला लोकसभा निवडणुकीत त्यांनी सुकाणू समिती सदस्य म्हणून जबाबदारी पार पाडली. त्याच वर्षी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेश प्रवक्ते म्हणूनही त्यांनी पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडली. वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश महासचिव म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करत युवा संघटनेची भक्कम उभारणी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक जिल्ह्यांमध्ये युवा आघाडीचे जाळे अधिक मजबूत झाले.

राजेंद्र पातोडे हे लेखक म्हणूनही ओळखले जातात. त्यांनी ''आंबेडकरी चळवळीचा अकोला पॅटर्न (१९२०२०२४)'' हा ऐतिहासिक ग्रंथ लिहिला आहे. या पुस्तकात अकोला जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीचा १०४ वर्षांचा राजकीय व सामाजिक इतिहास नोंदविण्यात आला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन १४ मे २०२५ रोजी दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे प्रबुद्ध भारतचे संपादक ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.



संघटनात्मक कार्यासोबतच त्यांनी विविध जनआंदोलनांमध्येही पुढाकार घेतला. अकोला जिल्हाधिकाऱ्यांच्या वाहनाची हवा काढून केलेले आंदोलन, अकोला-महान मार्गावरील हजारो झाडे वाचविण्यासाठीचे चिपको आंदोलन, तसेच विविध जनहिताच्या प्रश्नांवर मोर्चे, आंदोलने आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करून त्यांनी अनेकांना न्याय मिळवून दिला. पोलीस अत्याचाराच्या घटनांपासून ते जातीय तणावाच्या प्रसंगांपर्यंत सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील वंचित, पीडित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच आक्रमक भूमिका घेतली आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी झालेली त्यांची निवड ही त्यांच्या दीर्घकालीन संघटनात्मक कार्याची आणि पक्षनिष्ठेची दखल मानली जात असून, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची राज्यातील संघटनात्मक ताकद आणखी वाढेल, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे.

## महसूल दिनी श्री. संपत माने यांचा 'उत्कृष्ट सहायक महसूल अधिकारी' पुरस्काराने गौरव



**लातूर/प्रतिनिधी** : महसूल दिनानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमात सन २०२५-२६ या वर्षात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत तहसील कार्यालय, लातूर येथील श्री. संपत माने यांचा ''उत्कृष्ट सहायक महसूल अधिकारी'' म्हणून मा. जिल्हाधिकारी, लातूर यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

श्री. माने यांनी महसूल विषयक प्रकरणांचा वेळेत निपटारा, कार्यालयीन कामकाजाचे सुयोग्य नियोजन, प्रलंबित प्रकरणे कमी करण्यासाठी विशेष मोहीम, इ कामे केली.

महसूल विभागाच्या ऑनलाईन सेवांचा प्रभावी वापर, डिजिटल माध्यमातून सेवा वितरण, ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी अवलंब, नागरिकांना वेळेत व सुलभ सेवा उपलब्ध करून देणे, तसेच पारदर्शक आणि उत्तरदायी प्रशासनासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. नागरिकांच्या तक्रारींचे संवेदनशीलतेने निराकरण करून त्यांच्या कामांना प्राधान्य दिले.

महसूल प्रशासनातील नावीन्यपूर्ण कामकाज, उत्कृष्ट नियोजन आणि लोकाभिमुख कार्यपद्धतीची दखल घेऊन महसूल दिन विशेष कार्यक्रमात हा प्रतिष्ठेचा सन्मान प्रदान करण्यात येत आहे.

# आंबेडकर सांस्कृतिक सभागृहासाठी निर्णायक एल्गार..., १२ ऑगस्टपासून बेमुदत उपोषणाचा इशारा..

## ४० वर्षांपासून समाजाच्या सामाजिक-सांस्कृतिक चळवळींचे केंद्र असलेल्या जागेच्या हस्तांतरणासाठी प्रशासनाला आठ दिवसांचा अल्टिमेटम

**निलंगा/प्रतिनिधी** : निलंगा शहरातील अशोकनगर येथील गायरान जमीन सर्वे क्रमांक १७३ मधील २०० बाय १८० फूट जागा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक सांस्कृतिक सभागृहासाठी नगर परिषदेकडे हस्तांतरित करून संबंधित ७/१२ उताऱ्यावर आवश्यक नोंद करण्यात यावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते अंकुश ढेरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, निलंगा यांना निवेदन सादर केले आहे. या मागणीवर आठ दिवसांच्या आत निर्णय न झाल्यास १२ ऑगस्ट २०२६ पासून उपविभागीय कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनानुसार, संबंधित जागेचा वापर गेल्या सुमारे चार दशकांपासून आंबेडकरी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक उपक्रमांसाठी सातत्याने होत आहे.भारतरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर, तथागत भगवान गौतम बुद्ध, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, संत कबीर, संत गाडगे महाराज यांच्यासह विविध महामानवांच्या सार्वजनिक जयंती, सामाजिक कार्यक्रम आणि जनजागृतीचे उपक्रम याच ठिकाणी नियमितपणे आयोजित करण्यात येत असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे.

नगर परिषदेनेही या परिसरात सुमारे २०० झाडांची लागवड केली असून, त्याच सर्वे क्रमांकात विविध समाजांच्या स्मशानभूमींची शासनाकडे नोंद आहे. त्यामुळे त्याच धर्तीवर आंबेडकर सांस्कृतिक सभागृहासाठीही जागेची अधिकृत नोंद करून ती नगर परिषदेकडे हस्तांतरित करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात सांस्कृतिक सभागृह उभारणीसाठी आवश्यक प्रशासकीय व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होण्यास मदत होईल, असे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी आणि भावी पिढ्यांमध्ये सामाजिक प्रबोधनाची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी स्वतंत्र सांस्कृतिक सभागृहाची गरज आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीकडे संवेदनशीलतेने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

दरम्यान, १२ ऑगस्टपासून प्रस्तावित बेमुदत उपोषणामुळे या प्रश्नाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, प्रशासनाने वेळेत निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

# येळंबघाट येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद संपन्न

**केज/प्रतिनिधी** : येळंब घाट येथील बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात येळंब घाट केंद्रा अंतर्गत आयोजित चालू २०२६-२०२७ शैक्षणिक वर्षातील पहिल्या केंद्रीय शिक्षण परिषदेचे यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले.

गटशिक्षणाधिकारी मॅडम, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी क्षीरसागर, यांच्या मार्गदर्शनाखाली व संयोजक समूह साधन केंद्राचे केंद्र समन्वयक श्रीमती. देशमुख एस.एस.यांच्या आयोजनातून अतिशय उत्साही व शैक्षणिक वातावरणात २०२६-२७ शैक्षणिक वर्षातील पहिली केंद्रस्तरीय शिक्षण परिषद बळवंतराव कदम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पार पडली. विद्यालयाचे प्राचार्य करडीले डी.



एन.यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या परिषदेत केंद्रीय प्राथमिक शाळेचे केंद्रीय मुख्याध्यापक वाघमारे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होती, तर मार्गदर्शक म्हणून अशोक कोकाटे, अतुल वाघमारे,व सदाशिव रोकडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी संयोजिका, केंद्र समन्वयक श्रीमती देशमुख मॅडम यांनी आढावा घेत परिषदेचे प्रास्ताविक केले. चालू शैक्षणिक वर्षातील करावयाची प्रशासकीय कामे, गुणवत्ता वाढीबाबत करावयाची कार्यवाही, खान अकॅडमी, शालेय व्यवस्थापन समिती पुनर्रचना, दीक्षा कोर्सेस, व शालेय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक त्या अनेक बाबीवर या परिषदेत चर्चासत्र पार पडली. इयत्ता चौथी ,सातवी स्कॉलरशिप, पाचवी, आठवी स्कॉलरशिप, पाचवी नवोदय या परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शक करणाऱ्या अध्यापकांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. येळंबघाट केंद्रा अंतर्गत येणाऱ्या १३ माध्यमिक व प्राथमिक शाळाचे मुख्याध्यापक व शिक्षक यांची या परिषदेस उपस्थिती होती.

अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या परिषदेचे अत्यंत बहारदार सूत्रसंचालन विद्यालयाचे उप मुख्याध्यापक चौरे व्ही.एस. यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक लहाने डी एस,कदम एन.पी.,कांबळे डि. आर., सुरवसे. एस.जी. यांच्यासह सर्व व्यवस्थेचे उत्कृष्ट नियोजन केलेल्या या परिषदेची सांगता वंदे मातरम् ने करण्यात आले.



# पाठ्यपुस्तकातील लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला या नावीन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधून अनेक कवी, लेखक निर्माण होतील- शिक्षक आ. विक्रम काळे

## बीडमध्ये 'प्रत्यक्ष कवी-लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला' उपक्रमाचे मोठ्या उत्साहात उद्घाटन; शिक्षक दरबारात प्रश्नांचा पाढा

**बीड/प्रतिनिधी** : पाठ्यपुस्तकात ज्यांच्या साहित्याचा अभ्यास केला जातो, तेच कवी आणि लेखक प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला आल्याने विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला आणि लेखनकौशल्याला नवी दिशा मिळेल. या नावीन्यपूर्ण उपक्रमातून भविष्यात अनेक नवे कवी आणि लेखक घडतील, मराठी भाषा अधिक समृद्ध होईल आणि विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची गोडी वाढून परीक्षेतील निकालाचा टक्काही निश्चितच उंचावेल, असा विश्वास मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम (बप्पा) काळे यांनी व्यक्त केला. लोकनेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच आमदार विक्रम काळे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी शिक्षक संघाच्या वतीने मराठवाड्यातील ४० शाळांमध्ये बालभारतीच्या 'पाठ्यपुस्तकातील प्रत्यक्ष कवी/लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन बुधवार, दि. ५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता द. बा. घुमरे विद्यालय, बीड येथे आमदार विक्रम काळे यांच्या हस्ते उत्साहात झाले. कार्यक्रमाच्या उद्घाटनानंतर लाडके शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी शिक्षणामुळेच माणसाचा विकास होतो. प्रगती होते. शिक्षण माणसाला स्वतःच्या पायावर उभे राहण्याची ताकद देते. शिक्षणामुळेच व्यक्तिमत्त्वाचा विकास, प्रगती आणि उज्ज्वल भविष्य घडते. त्यामुळे चांगला अभ्यास करा, प्रचंड मेहनत करा, नेहमी सत्याचा मार्ग स्वीकारा आणि शाळेत नियमित उपस्थित राहा असे मौलिक मार्गदर्शन केले. मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये दहावीच्या परीक्षेत राज्यातील ९४



हजार ४०० विद्यार्थी मराठी विषयात नापास झाल्याबद्दल चिंता व्यक्त करत,ज्या मातृभाषेत आपण वाढलो, त्या मराठी भाषेला इंग्रजी आणि गणिता इतकेच महत्त्व दिले पाहिजे असे आवाहन शिक्षकवृंदाला केले. मराठी विषयात एकही विद्यार्थी नापास होऊ नये, या उद्देशाने मराठवाड्यातील ४० आणि बीड शहरातील सहा शाळांमध्ये हा विशेष उपक्रम सुरू करण्यात आल्याची माहिती दिली. या उपक्रमामुळे पाठ्यपुस्तकात ज्यांच्या साहित्याचा अभ्यास केला जातो, तेच कवी आणि लेखक प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला आल्याने विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला, सर्जनशीलतेला आणि लेखनकौशल्याला नवी दिशा मिळेल. या नावीन्यपूर्ण उपक्रमातून भविष्यात अनेक नवे कवी आणि लेखक घडतील, असा विश्वास मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम (बप्पा) काळे यांनी व्यक्त केला. बालभारतीच्या मराठी पाठ्यपुस्तकातील कौतुकाची थाप इ.४ थी या पाठाचे प्रत्यक्ष लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी द.बा .घुमरे पब्लिक स्कूल, यशवंत विद्यालय, शिवाजी विद्यालय, आदर्श विद्यालय, छत्रपती राजश्री शाहू विद्यालय ,इंदिरा विद्यालय या सहा शाळेत प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी, शिक्षकासोबत कौतुकाची थाप या पाठावर दिलखुलासपणे चर्चा केली. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तरे दिली. प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील लेखकाला पाहून विद्यार्थी भारावून गेले होते.

मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात पाच शाळेत पाठ्यपुस्तकातील प्रत्यक्ष कवी, लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला जाणार असून लातूर, धाराशिव, हिंगोली, परभणी येथे प्रा. रामदास केदार (गीत मराठी गाऊ या इ.६वी) , नांदेड कवी सुरेश सावंत (अंतराळवीर इ.३री) तर छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना येथे अय्युब पठाण लोहगावकर (कौतुकाची थाप, इ.४थी) हे सर्व साहित्यिक प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या भेटीला जाऊन पाठ्यपुस्तकातील पाठावर, कवितेवर विद्यार्थी, शिक्षकासोबत दिलखुलासपणे चर्चा करीत आहेत. पाठ्यपुस्तकातील कवी विद्यार्थ्यांच्या भेटीला या नावीन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण मराठवाड्यात करण्यात आलेले असून आतापर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सात शाळेत, जालना जिल्ह्यातील सात शाळेत, बीड जिल्ह्यातील सात शाळेत, धाराशिव जिल्ह्यातील सात शाळेत अशा एकूण २८ शाळेत हा उपक्रम पूर्ण झालेला असून लगेचच लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली या जिल्ह्यातील शाळेमध्ये हा उपक्रम सुरू होणार आहेत.

### 'कौतुकाची थाप'च्या लेखकाची विद्यार्थ्यांशी दिलखुलास भेट!

उद्घाटनानंतर इयत्ता चौथीच्या पाठ्यपुस्तकातील 'कौतुकाची थाप' या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनी द. बा. घुमरे पब्लिक स्कूल, यशवंत विद्यालय, शिवाजी विद्यालय, आदर्श विद्यालय, छत्रपती राजर्षी शाहू विद्यालय आणि इंदिरा विद्यालय या सहा शाळांना प्रत्यक्ष भेट देत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. पुस्तकाच्या पानांवर ज्या लेखकाचे साहित्य वाचले, तोच लेखक आपल्या समोर प्रत्यक्ष उभा असल्याचे पाहून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कुतूहल आणि आनंद दिसून आला. विद्यार्थ्यांनी लेखकांना त्यांच्या लेखनप्रवासापासून ते 'कौतुकाची थाप' या पाठाच्या निर्मितीपर्यंत विविध प्रश्न विचारले. लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांनीही विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना अतिशय सहज, सोप्या आणि दिलखुलास शैलीत उत्तरे देत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला. या भेटीमुळे 'लेखकही आपल्यासारखाच एक माणूस आहे आणि आपणही लिहू शकतो' हा आत्मविश्वास विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होण्यास मदत होणार आहे. यातून प्रेरणा घेऊन भविष्यात अनेक कवी, लेखक निर्माण होतील असा विश्वास शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी या कार्यक्रमात व्यक्त केला.

### मराठवाड्यात उपक्रमाची धडाकेबाज घोडदौड

मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव या जिल्ह्यांतील २८ शाळांमध्ये उपक्रम यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. आता लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यांत या उपक्रमाची सुरुवात होत आहे. या उपक्रमात प्रा. रामदास केदार ('गीत मराठी गाऊ या' इयत्ता सहावी), कवी सुरेश सावंत ('अंतराळवीर' इयत्ता तिसरी) आणि लेखक अय्युब पठाण लोहगावकर ('कौतुकाची थाप' इयत्ता चौथी) हे विद्यार्थी-शिक्षकांशी संवाद साधत आहेत. शिक्षक दरबारात प्रश्नांचा पाढा; आमदार काळेंकडून पाठपुराव्याचे आश्वासन विद्यार्थ्यांच्या भेटीगाठी आणि संवादानंतर दुपारी ४ वाजता स्काऊट भवन, बीड येथे आमदार विक्रम काळे यांच्या पुढाकाराने 'शिक्षक दरबार' पार पडला. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित प्रश्नांचा पाढा थेट आमदारांसमोर मांडला. यावेळी विनाअनुदानित शाळांना अनुदान, अंशतः अनुदानित शाळांना १ एप्रिल २०२७ पासून पुढील वाढीव अनुदानाचा टप्पा, जुनी पेन्शन योजना,बी.एल.ओ. जनगणना, एस.आर.एस. यांसारख्या अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा, डिजिटल शाळा तसेच विविध सेवाविषयक प्रश्न यावर सविस्तर चर्चा झाली. शिक्षकांच्या प्रश्नांवर शासन आणि संबंधित प्रशासकीय विभागांकडे सातत्याने पाठपुरावा करून ते प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, असे आश्वासन आमदार विक्रम काळे यांनी यावेळी दिले.

### विद्यार्थ्यांच्या हातात लेखणी, शिक्षकांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा निर्धार!

एकाच दिवशी विद्यार्थ्यांसाठी 'पाठ्यपुस्तकातील प्रत्यक्ष कवी/लेखक विद्यार्थ्यांच्या भेटीला' आणि शिक्षकांसाठी 'शिक्षक दरबार' असे दोन महत्त्वपूर्ण उपक्रम राबवून आमदार विक्रम (बप्पा) काळे यांनी शिक्षण क्षेत्राशी असलेली आपली बांधिलकी अधोरेखित केली. विद्यार्थ्यांच्या मनात साहित्याची गोडी निर्माण करण्याबरोबरच शिक्षकांच्या प्रश्नांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी जि.प. प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, माध्यमिक शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील मॅडम, उपशिक्षणाधिकारी धनंजय शिंदे, वेतन अधीक्षक राजेश खटावकर, दीपक घुमरे, गणेश वाघ, विपुल काळे, रवींद्र खोड, बाळासाहेब मुळे,कल्याणराव वाघमारे, प्रदीप विखे, एम. एम. खुटे, नवनाथ म्हात्रे, संजय शिंदे, पाखरे, आत्माराम वाव्हळ, प्रतिभा आडसुळे यांच्यासह मराठवाड्यातील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.